मंगळवार दि.२८ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २७०
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंडे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

## लोकसभेत जी खटपट झाली, ती विधानसभेत होता कामा नये

# भाजपला सांगा, ८०-९० जागांचा वाटा आम्हाला मिळालाच पाहिजे-भुजबळांची दादांना आठवण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आपण सत्तेत सहभागी होताना भारतीय जनता पक्षाने विधानसभेला ८० ते ९० जागा लढवू देण्याचा शब्द दिला होता, तो पाळला जावा, लोकसभेत जी खटपट झाली. ती विधानसभेत होता कामा नये, अशी अपेक्षा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे व्यक्त केली. मुंबईत राष्ट्रवादीच्या विचारमंथन बैठकीत भुजबळ हे बोलत होते.भुजबळ म्हणाले की, भाजपकडून विधानसभा निवडणुकीत ८० ते ९० जागांचा शब्द देण्यात आला आहे. आपल्या हक्काचा वाटा आपल्याला मिळायलाच हवा. लोकसभेला झालेल्या रस्सीखेचाची पुनरावृत्ती होऊ नये. लोकसभा निवडणुकांचा निकाल जाहीर होण्याआधीच भुजबळांनी दिलेल्या शब्दास जागण्याचा इशारा भाजपला दिला तर अजित पवारांना त्याची पुन्हा भरसभेत आठवण करून दिली.

भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, विधानसभेत योग्य जो वाटा आहे, तो आपल्याला महायुतीमध्ये आपल्याला मिळायला पाहिजे. आपण आलो, त्यावेळीही त्यांनी आपल्याला सांगितलं ८०-९० जागा मिळतील, या वेळेला (लोकसभा) जी काय खटपट झाली, ती पाहता पुढे ही खटपट होता कामा नये. आम्हाला एवढ्या जागा मिळाल्या पाहिजेत, हे आधीच आपल्याला त्यांना सांगावं लागेल. तेवढ्या मिळाल्या तर ५०-६० निवडून येणार हो. ५० च घ्यायच्या... मग त्यातल्या काही गळाल्या की आम्ही आणखी खाली येणार. तसं होताच कामा नये, त्यामुळे आताच त्यांना सांगून टाकावं, आमचा वाटा आम्हाला मिळायला हवा, असे भुजबळ यांनी व्यासपिठावरून बोलताना अजित पवारांकडे म्हणत सांगितले.लोकसभा निवडणुकीत नाशिकच्या जागेवरुन महायुतीत चांगलीच ताणाताण झालेली पाहायला मिळाली होती. एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी यांच्यात जोरदार रस्सीखेच झाली. भाजपश्रेष्ठींनी आपल्याला नाशिकमधून लढण्यास सांगितलं होतं, मात्र उमेदवारी जाहीर होण्यात झालेली दिरंगाई पाहून माघार घेत आहे, असं भुजबळांनी पत्रकार परिषद घेत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेचे उमेदवार हेमंत गोडसे यांना पुन्हा तिकीट देण्यात आले.



## दीप भारती माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयचा दहावीचा निकाल १००%

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

दीप भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय माहोरा या शाळेचा एस एस सी बोर्ड परीक्षा मार्च २०२४ चा निकाल १०० टक्के लागला.शाळेतून सर्वप्रथम कुदर हर्षल दिलीप ९३.६०% द्वितीय क्रमांक कुमारी शिवकन्या गणेश जाधव९०.४०% तृतीय क्रमांक गाढे किरण केशव ८९.४०% गुण घेऊन क्रमांक पटकावत विद्यालयाची गुणवत्तेची परंपरा कायम राखली या परीक्षेला शाळेतून एकूण ४१ विद्यार्थी बसले होते त्यापैकी ४१ उत्तीर्ण झाले यापैकी विशेष प्राविण्यसह ३३ प्रथम श्रेणीत आठ उत्तीर्ण झाले उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री सुदामराव सदाशिवे दादा व संस्थेचे सचिव श्री दीपक सदाशिवे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पांडे सर व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मन:पूर्वक अभिनंदन केले व त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## आदर्श विद्यालय सिंदखेड राजा १० वीचा निकाल ९८.८५ % टक्के

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित आदर्श विद्यालय सिंदखेड राजा येथे दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा आदर्श विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.८५ % टक्के लागला आहे. त्यात एकूण ८८ विद्यार्थी पैकी प्राविण्य श्रेणीत ७५ प्रथम श्रेणीत ०८ द्वितीय श्रेणीत ०३ उत्तीर्ण झाले. यातील विद्यालयात प्रथम क्र. - कु. संतोषी भगवान केळकर - ९३.४० % द्वितीय क्र.-कु. पुजा नारायण टेके ९२.८० % तृतीय क्र.- कु.पुजा नागोराव फुले ९१.६० % घेऊन उत्तीर्ण झाले. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री. रामकृष्णदादा शेटे, उपाध्यक्ष श्री. नागोरावजी बाहेकर व सचिव श्री. प्रेमराजजी भाला आणि सर्व संचालक मंडळ, चिखली तसेच विद्यालयाचे मुख्यध्यापक व शिक्षक वृंद यांनी कौतुक केले.



हार्दिक अभिनंदन! हार्दिक अभिनंदन! हार्दिक अभिनंदन! हार्दिक अभिनंदन!

दहावीच्या बोर्ड परिक्षेत घवघवीत यश मिळविलेल्या

सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन

तसेच भविष्यातील उत्तुंग भरारीसाठी आभाळभर शुभेच्छा....!


कु.संतोषी केळकर
९३.४०%


साईनाथ शरद जायभाये
९३.२०%


श्रद्धा गजानन जाधव
९२.४०%


कु.पुजा नारायण टेके
९२.८०%


कु.पुजा नागोराव फुले
९१.६०%


स्वरुप संजय सोनुने
८७.४०%


पूर्वा राजेश साळवी
८१.००%

शुभेच्छुक- स्व बी.के मुंडे पॅरामेडिकल ॲन्ड टेक्निकल इन्स्टिट्यूट सिंदखेड राजा,दैनिक लोकनेता परिवार, विश्व मल्टिपर्पज फाऊंडेशन म.राज्य (संपर्क ९०६०२०९१४९/७४९९६१५९३३)

## संपादकीय

# धोकादायक कारखान्यांचं काय करायचं ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

परत एकदा धोकादायक कारखाने नागरी वस्तीतून हलवा आणि कारखान्यांभोवती एक किलोमीटरचा मोकळा पट्टा निर्माण करा, या मागण्यांनी जोर धरला आहे. सरकारने डोंबिवलीतील दीडशे कारखान्यांचे स्थलांतर करणार, अशी घोषणा काही वर्षांपूर्वी केली होती. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने कारखानदारांना नवीन ठिकाणी जमीन तुम्ही विकत घ्या, असे सांगितले. सध्याच्या कारखान्याखालील जमिनीची बाजारभावाने किंमत देण्यास नकार दिला. इतरही प्रश्न आहेत. स्थलांतराच्या खर्चाचे काय? बेकार होणाऱ्या कामगारांचे काय? नवीन ठिकाणी हीच नागरी वस्तीची समस्या आणखी पाच-दहा वर्षांत उभी राहणार नाही याची हमी काय?या सर्व समस्यांमुळे कोणताही राजकीय पक्ष अशा संवेदनशील प्रश्नाचा पाठपुरावा करण्यात रस घेत नाही, हेही तितकेच खरे. जगातील सर्वांत मोठा औद्योगिक अपघात म्हणजे डिसेंबर १९८४मध्ये भोपाळमधील युनियन कारबाइड कारखान्यात झालेली मिथेल आयसोसायनेटची (एमआयसी) वायूगळती. त्यात अंदाजे ४००० ते १६००० व्यक्तींचा मृत्यू झाला, तर सहा लाखांपेक्षा जास्त बाधित झाले. निश्चित आकडा कुणालाच माहिती नाही. या भीषण अपघाताला चाळीस वर्षे झाली तरी भारतात अजूनही बफर झोन निर्माण करण्यात आलेला नाही. केंद्रीय पर्यावरण विभागाने रासायनिक कारखान्यांच्या वसाहतीभोवती अर्धा किलोमीटर रुंदीचा हरित पट्टा निर्माण करावा, त्यात कोणत्या प्रकारची झाडे लावावी ही मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. अंमलबजावणी व्हायची आहे आणि जरी झाली तरी ज्या वसाहती अस्तित्वात आहेत, त्यांना याचा काही उपयोग नाही.या समस्येला न्यायालयीन पार्श्वभूमीही आहे. भोपाळ दुर्घटनेची भीती वाटून ठाण्यातील सात धोकादायक रासायनिक कंपन्यांनी १९९३मध्ये मुंबई येथील उच्च न्यायालयात याचिका दाखल केली की, 'आम्ही धोकादायक आहोत. आमच्या भोवती एक किलोमीटरचा मोकळा पट्टा पाहिजे. तीस वर्षांपूर्वी (१९६३ ) आम्ही ठाणे येथे सरकारने माफक दरात दिलेल्या जागेत कारखाने उभारले तेव्हा आजूबाजूला सात आठ किलोमीटरमध्ये नागरी वस्ती नव्हती, कोणतेही निवासी प्रकल्प नव्हते. १९९०च्या दरम्यान मोठमोठे निवासी प्रकल्प आमच्या कंपन्यांच्या जवळ उभे राहू लागले. त्यामुळे आम्ही चिंतित झालो आहोत. कारण आठ-दहा वर्षांपूर्वी भोपाळ येथे झालेला महाभयानक मानवसंहार ठाण्यात होऊ नये, अशी आमची इच्छा आहे.' मी यातील एक प्रमुख कंपनी बेयरचा संचालक म्हणून हा खटला लढत होतो. उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश देऊन या कारखान्यांजवळची नवीन बांधकामे थांबवली.कंथारिया आणि एम. एफ. सालढाना हे न्यायमूर्ती होते. सालढाना यांनी जून १९९४मध्ये लिहिलेल्या निकालपत्रात प्रश्न उपस्थित केला की, भोपाळ आणि चेर्नोबिल नंतर आता ठाण्याची पाळी का? इतिहास हा धडा घेण्यासाठी असतो.उच्च न्यायालयाने या कंपन्यांपासून एक किलोमीटरमध्ये नवीन बांधकाम करण्यास बंदी घातली. आहेत ती सार्वजनिक ठिकाणे व रहिवासी यांचे स्थलांतर व पुनर्वसन करावे, असे राज्य सरकारला आदेश दिले. परंतु हे सर्व करणे अशक्यप्राय होते, कारण वस्ती खूप वाढली होती. शेवटी फ्लॅट मालकांच्या वतीने एम. सी. मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयात विशेष अर्ज केला की, या कंपन्यांनाच ठाण्याबाहेर हलवा. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयात न्या. कुलदीप सिंग आणि न्या. हंसारिया यांच्यासमोर सुनावणी सुरू झाली. न्या. कुलदीप सिंग हे पर्यावरण रक्षणासाठी निवाडे देणारे भारतातील पहिले न्यायमूर्ती. त्यांनीच तत्कालीन केंद्रीय पर्यावरणमंत्री कमलनाथ यांना दहा लाख रुपये दंड केला होता. कारण त्यांच्या हॉटेल कंपनीने अतिक्रमण करून बिआस नदीचा प्रवाह बदलण्याचा प्रयत्न केला होता व त्यामुळे मोठा पूर येऊन हानी झाली होती. ती केससुद्धा एम. सी. मेहता यांनीच दाखल केली होती. त्यांनीच दिल्लीतील कारखाने शहराबाहेर काढून तिथे बागा निर्माण करा, असा निकाल दिला होता.न्या. कुलदीप सिंग यांनी आम्हाला प्रस्ताव दिला की, तुम्ही कंपन्याच ठाणे सोडा. सर्व कंपन्या निराश झाल्या. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारच्या मदतीने पुढील सुनावणीच्या वेळी आम्ही मोठ्या मिनतवारीने कुलदीप सिंग यांचे मन वळवले की, हा खटला तांत्रिक आहे. त्यावर उपाय तंत्रज्ञ शोधू शकतील व राज्य सरकारने एनव्हायर्नमेंट (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत एक लवाद नेमावा. न्यायमूर्ती हे दोन महिन्यांत सेवानिवृत्त होत होते म्हणून असेल कदाचित, त्यांनी हा प्रस्ताव मान्य केला. पुढे राज्य सरकारने डॉ. गर्ग यांची एक सदस्य समिती नेमली. या समितीने या कंपन्यांनी धोकादायक केमिकलचे उत्पादन व साठवणूक थांबवावी, अशी शिफारस केली. ती या कंपन्यांनी अंमलात आणली व प्रश्न सुटला! आता या सर्व कंपन्यांनी कारखाने बंद करून आपल्या जागा बिल्डर्सना विकल्या आहेत!परत एकदा डोंबिवलीकडे वळू या. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने रासायनिक कारखान्यांच्या दोन विभागांच्या मध्ये निवासी विभाग स्थापन केला, ही घोडचूक होती. आणखी एक-दोन ठिकाणी त्यांनी हेच केले. शहरी भागात मोकळी जागा सोडणे अशक्य आहे, कारण त्या जागेवर लगोलग अतिक्रमण होते आणि मानवी समस्या उभी राहते. आपण वर पाहिले की सर्वोच्च न्यायायालयानेसुद्धा तीस वर्षांपूर्वी मानवी समस्येला जास्त महत्त्व दिले. डोंबिवलीतील या कारखान्यांनी धोकादायक रसायनांचे उत्पादन आणि साठवणूक बंद करणे आणि प्रदूषण न करणारे नवीन व्यवसाय उभारणे हा एकमेव मार्ग दिसतो आहे. त्यांचे नुकसान होणार नाही, हे पाहणे सरकारचे कर्तव्य आहे. येथील कामगारांचा प्रश्न थोड्या फार प्रमाणात त्यांना नवीन प्रशिक्षण देऊन सोडविता येईल का, हे पाहिले पाहिजे.प्रश्न उभा राहतो की, धोकादायक रासायनिक कारखाने न्यायचे तरी कुठे? भारतात कुठेही नेले तरी त्यांच्या आजूबाजूला नागरी वस्ती मग ती अनधिकृत का असेना होणार हे निश्चित. सुधारलेले देश अप्रगत देशांकडून असा धोकादायक माल आयात करतात यामागाचे हेच रहस्य आहे, कारण त्यांच्या लेखी मानवी जीवनाची किंमत खूप आहे.

# आता कसं वाटतंय झाडाचे लबाड माणसाला पत्र

लोकनेता न्यूज नेटवर्क

मी ऐकले दिवस मावळला तरी तळपत म्हणे अंधार पडलेला असतो लाही मात्र कायम असते सुर्य डुबतो उष्णता नाही एसीतून बाहेर पडले की कढाईत ढकलेल्या सारखे होते बागायती टोपी खाली ओल झालेलं डोस्क उष्माघाताने कोलाहल होतो लेकरांना बाहेर नेण्याचा लाग नाही झाडाच्या खाली तर आता माणसे कमी आणि गाड्या जास्त लावलेल्या असतात ४२ प्लस मध्ये तुम्ही तळून निघाताय हे काय मला तरी बरं दिसत का माझ्या कुळा मुळाची ह्यात मानवाची सेवा करण्यात गेली माझ्या डोक्यावर ऊन घेऊन तुम्हाला सावली देण्यात माझ्या पिढ्या सरल्या मात्र तुम्ही मला काय दिले अरे राजावी मला तोडले नाही तुमचे तुमच्या पायावर कुऱ्हाड मारुन घेतली मी फुले द्यायची फळे द्यायची उन्हात सावली द्यायची अन् तुम्ही काय कुऱ्हाड एवढे तर परोपरकारी तुम्ही माझा स्वार्थ कधीच नव्हता वसुंधरा अन् मी माय लेकरे आईच्या उदरात आमचा जन्मच तुमची सेवा करायला मोबदला आम्हाला नकोच आहे मात्र किमान तुमच्या अस्तित्वासाठी माझे अस्तित्व तुम्ही जपले पाहिजे राजा हो तुमच्या सरकारने ३३ टक्के वन करायची घोषणा केली किती टक्के आहे दोन तीन चार पाच किती टक्के ही जी उष्णता आहे ना ही केवळ तुम्ही ओढावून घेतलेली आहे आज मराठवाडा नुसता भाजतो आहे तुमच्या चुलीवरच्या तव्यावर पोट भरायला उभा केलेल्या चुली आयुष्याच्या चुलीत पाणी घालताना सिध्द होत आहेत मी एक झाड नाही तुम्हाला ऑक्सिजन देणारा तुमचा मित्र आहे राजा हो मला काय देणार आहात मला माझी जागा सोडता येत नाही तुम्ही तुमची जागा सोडू नका झाडे लावा झाडे जगवा ही घोषणा लबाड ठरते तेव्हा वाढदिवसाचं वृक्षारोपण पुढच्या वाढदिवसाला करपून गेलेले असते म्हणूनच आज कळकळीने पत्र लिहतोय तिकडे कोकणात जा आता थंडी वाजते अगदी सायंकाळी तर हुडहुडी असते आणि मराठवाड्यात ७ वाजले तर घामाच्या धारा वाटत नाही का आम्ही कुठले तरी पाप फेडत आहोत होय झाड तोडण्याचे पाप वेळेत सावरलं तर ठीक नाहीतर आवरले म्हणून समज बीडमध्ये झाडे तुटताना वृक्षतोड मोहिम राबल्याप्रमाणे ती तोडताना आपण रोजच पाहतो मात्र अत्याधुनिक यंत्रानी ज्या वेगाने झाडे तोडली जातात त्या वेगाने वृक्ष लागवड होत नाही झाली तरी ती वृक्ष लागवड फोटो शेषन पुरती मर्यादित असते नवीन महामार्ग तयार करताना रस्ता रुंदीकरण व इतर कारणांमुळे सध्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे विकासाला आपला मुळीच विरोध नाही चांगल्या कामाचे स्वागतच आहे मात्र वृक्षतोड करण्यापूर्वी संबंधित यंत्रणावर नवे वृक्ष लागवडीची जिम्मेदारी दिली गेली पाहिजे ती कागदोपत्री दिलीही जाते मात्र प्रत्यक्षात झाडे लावली आणि वाढवली जात नाहीत मित्रांनो ही परिस्थिती बदलणे हेच आपल्या सर्व वृक्ष मित्रांचे ध्येय आहे झाडे जेवढ्या प्रामाणिकपणे तोडली जातात तेवढ्याच प्रामाणिकपणे ती लावलीही जावीत मागील दोन वर्षांपूर्वी सोलापूर धुळे या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरी कारणासाठी औरंगाबाद ते येडशी दरम्यान एक लाखाहून अधिक झाडे तोडली झाडे तोडलेल्या जागेवर नवी झाडे लावण्याचे प्रयोजन असतानाही या रस्त्यावर अजून वृक्ष लागवड कार्यक्रम सुरू झालेला नाही वृक्ष मित्रांचा आवाज सरकारी यंत्रणापर्यंत पोचत नाही आता आपल्याला आम्ही वृक्षमित्र ही चळवळ आणखी गतिमान करावी लागेल !

**प्रशांत बाफना**

## राज्यात फक्त २३.६३ टक्के जलसाठा;भीषण जल संकट

# सरासरी तापमान ४२.५२ अंश से. पार व उन्हाचे चटके सोसवेना

लोकनेता न्यूज नेटवर्क



उन्हाचे चटके चोहोबाजूंनी सोबतच नवतपाची झळ राज्याचा सरासरी तापमान वाढल्याने सुर्य आग ओकत आहे.उन्हाचे चटके जाणवू लागले असतानाच राज्यात लघु,मध्यम व मोठ्या प्रकल्पात केवळ २३.६३ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.यामुळे पाणी टंचाईच्या झळा सर्वत्रच जाणवू लागल्याने राज्यातील एकूण २५ जिल्ह्यात २ हजार ७९३ गावे आणि ७ हजार ६७१ वाड्यांमध्ये ३ हजार ६९२ टँकरने पिण्याच्या पाणीपुरवठा केला जात आहे.यामुळे यावर्षी पाणीप्रश्न अत्यंत धोका स्थितीत आहे.येत्या काळात उन्हाचा पारा वाढल्याने पाण्याची भिषण टंचाई निर्माण झाली आहे.राज्यात मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी टँकरची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.सध्याच्या परीस्थितीत राज्यातील धरणांची स्थिती अत्यंत गंभीर व बीकट आहे अमरावती ४०.४ टक्के,कोकण ४२.१२टक्के, नागपूर ४०.४३टक्के,नाशिक ३०.६५ टक्के, पुणे २३.६९ टक्के, मराठवाडा १३.४० टक्के, संभाजीनगर ११.८९ टक्के यावरून स्पष्ट होते की पाण्याच्या बाबतीत संभाजीनगर ,मराठवाडा व पुणे अत्यंत चिंताजनक स्थितीत असल्याने तीव्रपाणी टंचाई दिसून येते.राज्यातील ७३ टक्के क्षेत्रामध्ये अकाल पडलेला आहे.यामुळे १९ जिल्हे ४० तहसीलमध्ये पाण्याची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झाली आहे.कारण राज्यातील २ हजार ९९४ प्रकल्पांची एकुण क्षमता ४० हजार ४८५ दशलक्ष घनमीटर आहे.सध्या या प्रकल्पामध्ये फक्त १५ हजार १८९ दशलक्ष घनमीटर पाणी साठा उरला आहे. म्हणजेच दिवसेंदिवस पाण्याची समस्या आणखीनच बिकट होण्याची शक्यता दिसत आहे.सध्या राज्यातील १८ ते २० धरणे कोरडी पडली आहेत.त्यामुळे राज्याला तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.यावर्षी बदलत्या हवामानामुळे नेहमीपेक्षा कमी पाऊस झाल्याने उष्णतेच्या लाटे सोबतच पाण्याचाही हाहाःकार निर्माण झाला आहे.दरवर्षी पावसाची कृपादृष्टी असणारा पश्चिम महाराष्ट्र यंदा पाण्यासाठी तडफतो आहे. त्यामुळे आतापासूनच टँकरग्रस्त झाला आहे.पुणे विभागातील कोल्हापूर जिल्हा वगळता पुणे, सातारा, सांगली, आणि सोलापूर या चार जिल्ह्यांतील विहिरींनी तळ गाठला आहे. यामुळे ३३४ गावातील ६ लाख ७२ हजार ८०७ नागरिकांना ३६४ टँकरने पाणीपुरवठा करण्यात येत आहे.यावरून स्पष्ट होते की संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची टंचाई भेडसावत आहे. याचे प्रायचित्य मानव, पशुपक्षी, संपूर्ण जीवजंतू,जंगल संपदा यांना भोगावे लागत आहे.राज्यासह देशातील जलाशय साठा निम्म्यावर आलेला आहे तर दुसरीकडे सुर्य आग ओकत आहे म्हणजेच पाण्याची समस्या आणि सुर्याचे आक्राळविक्राळ रूप आणि जलसाठा कमी होने यामध्ये पृथ्वीतलावरील संपूर्ण जीवसृष्टीला यावर्षी अत्यंत कठीणायीचा सामना करावा लागतो आहे. महाराष्ट्रासह देशातील बदलत्या हवामानामुळे सर्वत्र उष्णतेची लाट तर कधी अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे संपूर्ण जीवसृष्टी मानव, पशुपक्षी यांचे जीवन विस्कळीत होतांना दिसते तर दुसरीकडे वाढत्या तापमानामुळे पाण्याची समस्या दिवसेंदिवस अत्यंत बिकट होतांना दिसत आहे.विदर्भात नागपूर, यवतमाळ, अकोला, चंद्रपूर येथे उष्णतेची लाट कायम आहे तर मुंबईसह रायगड, ठाणे, पालघर येथे उकाडा वाढला आहे.म्हणजेच सुर्याने आपले उग्र रूप कळत न कळत सर्वत्र पसरविले आहे.त्यामुळे हवामान खात्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना उष्णतेच्या बाबतीत रेड अलर्ट घोषित केले आहे.अकोला ४५.६० अंश सेल्सिअस, अमरावती ४४.४ अंश सेल्सिअस, सोलापुरचे तापमान ४३.१ अंश सेल्सिअस, चंद्रपूर ४३.४अंश सेल्सिअस, वाशिम ४३.८ अंश सेल्सिअस, यवतमाळ ४५.५ अंश सेल्सिअस, नागपूर ४१.७ विदर्भातील सरासरी तापमान ४२.५२ अंश सेल्सिअस, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर नोंद झाली.यावरून स्पष्ट होते की दिवसा तर उकाडा वाढलाच परंतु रात्रीही उकाड्याचे चटके संपूर्ण महाराष्ट्राला सहन करावे लागत आहे.राज्यातच नाही तर देशातील अनेक भागात सुर्य आग ओकतांना दिसतो आणि हा संपूर्ण प्रकार दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेला आहे.गंगेच्या खोऱ्यातील पश्चिम बंगाल,पूर्व झारखंड, उत्तर ओडिशा आणि रायलसीमा येथे कमाल तापमानात वाढ झाली आहे.कारण नदी, तलाव, विहिरी, धरणे यांच्या पाण्याची पातळी कमी कमी होत आहे आणि ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रातच नाही तर देशासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळेल. महाराष्ट्रात तापमानाचा पारा सिमापार वाढल्याने कठीण परिस्थितीत निर्माण झाली आहे.कारण मानवाने केलेला निसर्गाचा ह्यास यामुळेच आज आपल्याला उन्हाचे चटके व पाणी टंचाईचा सामना करावा लागतो आहे. त्याचप्रमाणे मानवाने केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मानव तर भोगतच आहे सोबतच पशुपक्षी, संपूर्ण जीवसृष्टी, पृथ्वी, आकाश-पाताळ,नदी-नाले,तलाव, धरणे, विहिरी यांनाही भोगावे लागत आहे.कारण राज्यासह देशातील वाढते तापमान हे दिवसेंदिवस निसर्गावर सरळ प्रहार करीत असुन संपूर्ण निसर्गाचे संतुलन ढासळत आहे त्यामुळे ही गंभीर समस्या निर्माण झाली आहे.त्यामुळे नागरिकांनी वाढत्या तापमानापासुन स्वतःला सांभाळणे गरजेचे आहे.बदलत्या हवामानामुळे यावर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे आतापासूनच राज्यातील अनेक भागात आपल्याला भिषण पाणी टंचाई दिसून येत आहे.जलाशयामध्ये फक्त २३.६३ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.म्हणजे एकीकडे तापमानात वाढ यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम,तर दुसरीकडे पाणी टंचाई अशा डबल गंभीर समस्यांशी आपणा सर्वांना झुंज द्यावी लागणार आहे.वाढत्या तापमानामुळे उष्णतेची व अवकाळी पावसाचे बादल महाराष्ट्रासह अनेक राज्यात दिसून येते.राज्यात वाढते तापमान पहाता आरोग्य विभागाने उष्माघातापासून बचाव करण्याचे आवाहन सुध्दा केले आहे.आज वाढत्या तापमानामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे त्यामुळे त्यांच्यासाठी आपापल्या पद्धतीने पाण्याची व्यवस्था केली पाहिजे व पशुपक्षांना वाढत्या तापमानापासुन दिलासा दिला पाहिजे.बदलते हवामान, पाणी साठा कमी होने,अती उष्णता, अवकाळी पाऊस याला रोखण्यासाठी राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.यामुळे वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येईल व निसर्ग प्रफुल्लित राहील.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# दीनदयाल विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वर्षी कायम

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**



शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय दे.राजा याही वर्षी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखण्यात यशस्वी झाले आहे. इयत्ता दहावी एसएससी बोर्ड परीक्षा २०२३-२४ च्या निकालाचा गोषवारा पुढील प्रमाणे आहे. एकूण परीक्षार्थी १९४,पैकी प्राविण्यश्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थ्यी ४७,प्रथम श्रेणीत८०, द्वितीय श्रेणीत५३,निव्वळ पास श्रेणीत११,तर फक्त ०३ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत याप्रमाणे विद्यालयाचा एकुण निकाल ९८.४५% लागला असून सेमी माध्यमातून राजेश रामेश्वर खांडेभराड ५०० पैकी ४५५ प्रथम क्रमांक,चेतन पुरुषोत्तम उजाड ४५४ गुण द्वितीय क्रमांक,तर सैरभ विष्णू वाघ ह्याने ४५३ गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. मराठी माध्यामातून प्रशांत दिपक सानप ३८९गुण प्रथम,युवराज गजानन फलटणकर ३५२ गुण द्वितीय क्रमांक, तर फैजान सरदार सैय्यद ह्याने ३४८ गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.वरील प्रमाणे उत्कृष्ट असा निकाल लागला असून शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.रामकृष्णदादा शेटे,सचिव प्रेमराजसेठ भाला यांच्यासह सर्व संचालक मंडळ,प्राचार्य श्री. एस.बी.गारडे,पर्यवेक्षक श्री.एस. एन.व्यास सर तसेच सर्व शिक्षक - शिक्षिका,प्राध्यापक प्राध्यापिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे हार्दीक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर यांनी अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता पुरवणी परीक्षेत चांगला अभ्यास करून अधिकाधिक गुण मिळवावेत असे आवाहन केले आहे.

# वादळी वाऱ्यासह पाऊसाने आनेकांचे नुकसान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**केज । अमोल सावंत**



मी श्री.सी बी एस ईनामदार जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार गट विनंती करतो की, काल रात्री दि. २५/ ५ / २०२४ रोजी वादळी वाऱ्यांसह पाऊस झाला , यात कमीत कमी दीडशे झाडे फळझाडासह जमीन उद्ध्वस्त झालेले आहेत ,व गावातील रहिवासी आणि शेतात राहणारे शेतकरी यांचे एकूण शंभर लोकांचे अतोनात नुकसान झालेले आहे,आपणास फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु फोन न लागल्यामुळे व्हाट्सअप द्वारे आपणास माहिती देत आहोत, प्रत्येक शेतकऱ्यांचा गुरांचा चारा ,जमीन उद्धस्त झालेले आहेत ,व कमीत कमी ६५ एम एम पाऊस झाल्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहेत , त्यामध्ये शेळ्यांच्या जनावरांच्या अंगावर झाड, पत्रे पडून जखमी झालेले आहेत,शेतातील गावातील मेन लाईनचे ५/ ६ खांबे पडलेले आहेत ,आपणास विनंती करण्यात येते की ,तात्काळ अधिकारी अथवा नायब तहसीलदार यांची नियुक्ती करावी वरील सर्व बाबीचे पंचनामे करून लाभार्थ्यांना अनुदान म्हणून जाहीर करावे ,दोन वाजून तीस मिनिटांनी आपल्या कार्यालयात आज दिनांक २६ मे २०२४ रोजी सादर करत आहोत कृपया वेळ द्यावी वरील सर्व वादळी वारे हे मौजे नाहोली तालुका केज जिल्हा बीड येथे झालेले आहे.आपला सी .बी .एस इनामदार जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी

# बालाजी शाळेची निकालाची परंपरा कायम दहावीचा निकालही १००%










■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

काल दिनांक २७ मे २०२४ रोजी घोषित झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा इयत्ता १० वी च्या निकालामध्ये बालाजी विद्यालयाने आपली यशाची उज्वल परंपरा कायम राखली. बालाजी विद्यालयाचा एकूण निकाल १०० टक्के ऐवडा लागला असुन यामध्ये जास्तीत जास्त मुलींनी बाजी मारली. परिक्षेला उपस्थित असलेल्या एकुण १२१ विद्यार्थ्यांपैकी १२१ विद्यार्थी उतीर्ण झाले असुन त्यापैकी तब्बल ५० विद्यार्थी हे ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेवुन उत्तीर्ण झाले तर ७१ विद्यार्थी हे मेरीटमध्ये प्रथम श्रेणीत म्हणजेच ७५ टक्यापेक्षा जास्त गुण घेवुन उत्तीर्ण झालेले आहेत. यामध्ये मराठी माध्यमामधुन प्रथम क्रमांक कु. पायल रमेश कोथलकर ९६.६० %, व कुमार गोपाल सांडु उंबरकर ९६.६० %, व्दितीय क्रमांक कु. मोनिका विलास गाडेकर ९६.४०% तृतीय क्रमांक कु.संजिवनी सिताराम बोडखे ९६.२०%, व कुमार गणेश प्रभु दामधर-९६.२०% तर ऊर्दू माध्यमामधुन प्रथम क्रमांक कुमार सय्यद मुफिज सय्यद अंजुम ९१.२०% व्दितीय क्रमांक कु. समानिया महेमूद शहा ९०. ८०%, तृतीय क्रमांक कु. शिफा ताहेर खान ९०.६०% ऐवढे गुण संपादित करुन हे सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे संस्थेच्या वतीने संस्था अध्यक्ष मा. श्री. बाळासाहेबजी कोथलकर, उपाध्यक्ष मा. डॉ. अनिलकुमारजी लाठे सचिव मा. श्री.संजयजी कोथलकर तसेच मुख्याध्यापक डॉ. श्री. कैलास फुसे श्री. घुनावत सर, श्री. खडके सर, श्री वनारसे सर,श्री. रिजवान सर, श्री. परदेशी सर, श्री बोडखे सर, श्री गजानन हिवाळे, श्री. मनिष कोथलकर, श्री. मंगेश खडके, यांनी हार्दिक अभिनंदन करुन विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस भरभरुन शुभेच्छा दिल्या.

# परळीच्या निवासी मुकबधीर विद्यालयाला वादळी वाऱ्याचा फटका; ६० फुट भिंत कोसळली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**



परळी वैजनाथ जवळील संगम येथील प्रज्ञा निकेतन शिक्षण संस्था संचलित निवासी मूकबधिर विद्यालयाचे काल दि. २६ मे रोजी आलेल्या वादळात मोठे नुकसान झाले आहे. या वादळात ६० फूट भिंत कोसळली आहे. यामुळे शाळेचे मोठे नुकसान झाले असून प्रशासनाने लक्ष देऊन नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी निवासी मूकबधिर विद्यालयाच्या वतीने करण्यात आली आहे.

रविवार दिनांक २६ मे रोजी दुपारी पाच वाजेच्या दरम्यान परळी शहर असं संपूर्ण तालुक्यात मोठे वादळी वारे आले होते. या वादळी वाऱ्याचा फटका प्रज्ञा निकेतन शिक्षण संस्था संचलित निवासी मूकबधिर विद्यालयाला बसला. मूकबधिर विद्यालयाची साठ फूट लांब भिंत कोसळली. यामुळे शाळेचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान प्रशासनाने याकडे लक्ष देऊन पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी प्रज्ञा निकेतन शिक्षण संस्था संचलित निवासी मूकबधिर विद्यालयातील मुख्याध्यापक व शिक्षक वृंदांनी केली आहे.

# साई कॅम्ब्रीज विद्यालयाची १०० % निकालाची परंपरा कायम








■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी। प्रतिनिधी**

आज दिनांक २७ से २०२४ रोजी घोषित झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता १० वी च्या निकालामध्ये साई कॅम्ब्रीज प्राथमिक ते उच्च माध्यमिक विद्यालयचे वालसावंगी आपली यशाची परंपरा कायम राखली आहे. साई विद्यालयाला एकूण निकाल १००% ऐवढा लागला असून यामध्ये मुलांनी बाजी मारली आहेत. परिक्षेला उपस्थित असलेल्या एकूण ५५ विद्यार्थीपैकी प्रथम श्रेणीत म्हणजे ७५% जास्त गुण घेवून उर्तीण झाली आहे. ५५ विदद्याची प्रथमश्रेणीत उर्तीण झाले आहेत.

यात गजानन इंगळे .९०.४०% घेऊन प्रथम क्र. घेतला दुबे अनुष्का ८८.४०% घेऊन द्वितीय क्र. राणा सीमाकुमारी अयोध्या ८८.२०% घेऊन तृतीय क्र घेतला. तसेच सर्वच विदयार्थी उर्तिर्ण झाले असून उत्तीर्ण विदयार्थी व त्यांच्या पालकांचे संस्था अध्यक्ष श्री किरण कुमार भुते. सचीवकपिल कुमार भुते, अविनाश वाघ, मुख्याध्यापक तायडे सर, गवळी सर,अल्हाट मॅडम,नादगावकर मॅडम, इत्यादी हार्दिक अभिनंदन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




**आष्टी । राजू म्हस्के: – सृष्टी सेवा भावी संस्था अंबाजोगाई जि बीड या संस्थेच्या वतीने रविवारी पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर येथे सामाजिक कार्यकर्त्या रेश्मा जगताप,झी २४ तासच्या रिपोर्टर चैत्राली राजापूरकर, क्राईम रिपोर्टर श्रावणी कामत यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे स्वागत करताना मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम व विकास डोंगरे यांनी स्वागत केले.**

# धानोरा (जहाँगीर) येथे ग्रामपंचायतीच्या वतीने जनतेला सुरळीतपणे पाणीपुरवठा–सौ.सविता शिंदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कळमनुरी । योगेश जाधव**



धानोरा येथे मागील चार वर्षांपासून पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली होती.पण आज दि.२५ मे २०२४ शनिवार रोजी जलजीवन मिशन अंतर्गत ईसापूर धरणातील विहिरीतून जुन्या सार्वजनिक पाण्याच्या टाकीत पाणी पुरवठा करून सर्व जनतेला पिण्याचे व वापरण्याचे पाणी मिळाल्यामुळे येणं उन्हाळ्यात पाण्याची मोठी टंचाई दूर झाली आहे अशी माहिती गावच्या सरपंच सौ.सविता रवि शिंदे यांनी दिली आहे.

धानोरा (जहाँगीर) ता.कळमनुरी जि.हिंगोली येथील सन १९९५ पासून कार्यरत असलेली २२ गांव मोरवाडी पाणीपुरवठा योजना सन २०२० पासून म्हणजे चार वर्षांपासून बंद पडल्यामुळे जनतेला पिण्याचे पाणी सुध्दा मिळत नव्हते. जलजीवन मिशन अंतर्गत गावाला एका वर्षापूर्वी पाणीपुरवठा योजना मंजूर झाली. ईसापूर धरणात पाण्याची विहिर करून पाईपलाईन व्दारे गावातील पाण्याच्या टाकीत पाणी आणण्याच्या योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.ईसापूर धरणातील विहिर आणि पाईप लाईनचे काम पूर्ण झाले आहे पण गावातील टाकीचे बांधकाम शिल्लक असल्यामुळे जुन्या पाण्याच्या टाकीत विहिरीची पाईपलाईन जोडणी करून आज दि.२५ मे २०२४ रोजी सर्व जनतेला पाणीपुरवठा करण्यात आला. धानोरा (जहाँगीर) ता.कळमनुरी गावातील जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी कळमनुरीच्या तहसिलदार सौ.नांदे मॅडम, गटविकास अधिकारी श्री.बारगिरे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता सौ.माकोडे मॅडम, उपविभागीय अभियंता श्री.बारी खान,भूजल सर्वेक्षण तत्ज्ञ श्री.सरकाळे, ग्रामसेवक सौ.ए.डी.गोरे, वीज वितरण कंपनीचे अभियंता श्री.घोडाम आणि प्रशासनाने सहकार्य केल्याबद्दल गांवच्या सरपंच सौ.सविता रवि शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

# शिरुर तालुक्यातील एकूण ३३ शाळांचा इयत्ता १० वीचा निकाल १००%

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरुर । विवेकानंद फंड**

आज दिनांक २७ मार्च रोजी जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या मार्च २०२४ च्या परीक्षेत शिरूर तालुक्यातील एकूण ३३ शाळांचा निकाल १००% लागला आहे. त्यात शिरुर शहरातील ५ नामांकित शाळांचा समावेश आहे. तर तालुक्याचा एकूण निकाल ९७ .४३% लागला आहे. याबाबत अधिक माहिती देताना गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर यांनी सांगितले की महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल बेस्ट ऑफ फाईव्ह पद्धतीने जाहीर करण्यात आला आहे. शिरूर तालुक्याचा दहावीचा एकूण निकाल ९७.४३ टक्के लागला आहे. या परीक्षेत तालुक्यातील ८७ माध्यमिक शाळेचे एकूण ६५४३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ६३७५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांमध्ये तालुक्यातून विशेष श्रेणीत २३०५, प्रथम श्रेणीत २३३९, आणि द्वितीय श्रेणीत १४०५ असे विद्यार्थी उत्तीर्ण झाल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी बाबर आणि शिरूर तालुका मुख्याध्यापक संघाचे सचिव मारुती कदम यांनी दिली. शिरूर तालक्यातील शंभर टक्के निकाल लागलेल्या शाळा पुढीलप्रमाणे : १) न्यू इंग्लिश स्कूल भांबर्डे, २) संभाजीराव पलांडे पाटील प्रगती हायस्कूल मुखई, ३) श्री. भैरवनाथ माध्यमिक विद्यालय करडे, ४) श्रीगुरुदेव दत्त विद्यालय संविदणे, ५) न्यू इंग्लिश स्कूल इनामगाव, ६) श्री नागेश्वर विद्यालय निमोणे, ७) श्री. महर्षी शिंदे हायस्कूल आंबळे, ८) श्री. सदगुरु कृपा विद्यालय नागरगाव, ९) श्री. गुरुनाथ विद्यालय वडनेर खुर्द, १०) कालिकामाता माध्यमिक विद्यालय वाघाळे, ११) श्रीमती बबईताई टाकळकर आश्रम शाळा निमगाव म्हाळुंगी १२) तात्यासाहेब खंडेराव सोनवणे विद्यालय, निर्वी, १३) न्यू इंग्लिश स्कूल उरळगाव, १४) न्यू इंग्लिश स्कूल पिंपळसूटी, १५) मा. बापूसाहेब गावडे विद्यालय म्हसे बुद्रुक, १६) हनुमान माध्यमिक विद्यालय निमगाव भोगी, १७) आयेशा बेगम उर्दू हायस्कूल शिरूर शहर, १८) आदर्श विद्यालय वरुडे, १९) जय मल्हार माध्यमिक विद्यालय चिंचोली मोराची, २०) शरदचंद्रजी पवार माध्यमिक विद्यालय चिंचणी, २१) एकता विद्यालय करंजावणे, २२) आर एम धारिवाल इंग्लिश मीडियम स्कूल शिरूर, २३) सौ. हिराबाई गोपाळराव गायकवाड माध्यमिक विद्यालय कासारी, २४) फ्रेंड्स एज्युकेशन इन्स्टिट्यूट कोरेगाव भीमा, २५) शिवाजी विद्यालय गोलेगाव,२६) श्री पद्मिनी जैन इंग्लिश स्कूल पाबळ, २७) विजयमाला इंग्लिश मीडियम स्कूल शिरूर, २८) आर एम धारिवाल सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल कोंढापुरी, २९) अजिंक्यतारा इंग्लिश मीडियम स्कूल ,३०) ज्ञानगंगा विश्वविद्यालय शिरूर, ३१) ज्ञानवर्धिनी विद्यामंदिर तळेगाव ढमढेरे, ३२) डी इ एस इंग्लिश मीडियम स्कूल बाबुराव नगर शिरुर, ३३) अक्षरनंदन गुरुकुल इंग्लिश मीडियम रांजणगाव गणपती, या शाळांचा समावेश आहे.

# शहरातील न्यू इरा पब्लिक स्कूलच्या दहावीच्या निकालाची परंपरा कायम

## दुसऱ्या वर्षीही शंभर टक्के निकाल





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत गेवराई शहरातील न्यू इरा पब्लिक स्कूल चा शंभर टक्के निकाल लागला आहे. दहावीच्या परीक्षेत याही वर्षी घवघवीत यश मिळवले असून शाळेतून आकांक्षा पिसाळ हिने प्रथम क्रमांक पटकावला आहे. शाळेतील ३१ विद्यार्थ्यां पैकी २६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उतीर्ण झाले आहे. दहावीचा निकाल सोमवारी जाहीर झाला. यामध्ये गेवराई शहरातील श्री गजानन बहुउद्देशीय सेवा भावी संस्था संचलित न्यू इरा पब्लिक स्कूलच्या ३१ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. या परीक्षेचा शंभर टक्के निकाल लागला आहे. यातील २६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उतीर्ण झाले आहे. तर इतर विद्यार्थी प्रथम श्रेणीत उतीर्ण झाले आहे. यामध्ये शाळेतून अकांक्षा पिसाळ ९४ टक्के गुण घेऊन प्रथम, तर द्वितीय खान आरमान हसन ९३. ८० टक्के, तृतीय तवले सृष्टी भागवत ९३.६० टक्के मिळाले आहेत. या शिवाय खंडागळे अमरनाथ गणेश ९१.४० टक्के, मणियार सानिया अनसार ९१.२०, पिसाळ सानिका गोपाल ९० टक्के, मुळे ईश्वरी सचिन ८९.४० टक्के, जाधव अकाश परमेश्वर ८९ टक्के, मेश्राम रितेश ८८.८० टक्के, खडके सृष्टी सुनिल ८८.४० टक्के, जाधव समर्थ विपुल ८८.२० टक्के, जाधव शुभम सुरेश ८७.८० टक्के, ठोसर भगवंत योगेश ८६.४० टक्के,शेख मोहमद असेफ आयुब ८६.४०, भोसले योगेश गणेश ८४.६० टक्के, चव्हाण अशिकेश राजू ८४.८० टक्के, राठोड सौरभ प्रकाश ८३.४० टक्के, निकम श्रावणी शिवाजी ८३ टक्के, खवले प्रदुम्न अनिरुद्ध ८२.२० टक्के, देवकते अभिषेक अशोक ८०.४०, तौर पार्थ लहू ८० टक्के, वाघमारे सिध्दार्थ सोनाजी ७९.४० टक्के, आडे शुभम संजय ७९.२९ टक्के, कोंटबे युवराज भागवत ७८.६० टक्के, कोंटबे समर्थ मनोहर ७३.४० टक्के, शेख फैजान शेख मिनाज ७०.२० टक्के, हे विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उतीर्ण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष गणेश क्षीरसागर, प्रा. वर्षा क्षीरसागर, मुख्याध्यापिका अश्विनी कुलकर्णी, नानासाहेब कडू, दिपाली जोशी, पठाण सुमैय्या, लक्ष्मीकांत सराफ, माधुरी तौर, मनिषा शिंदे, वैशाली कापसे आदींनी अभिनंदन केले आहे.

# भूईमूगाचे शेंगा काढण्याचे देशी जुगाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे बामणी येथील प्रगतिशील शेतकरी शंकर पाटील हासगुळे सायकल साहाय्याने भूईमूगाचे शेंगा काढण्याचे यंत्र तयार करून शेंगा घरच्या घरी काढत होते.तालुक्यातील गेल्या आठ दिवसापासून उष्णतेची लाट असल्याकारणाने भूईमूगाचे शेंगा काढण्यासाठी मजूर मिळत नसल्याने व अवकाळी पावसाने थैमान घातल्याने मजुराची कमतरता भासत असल्याने सायकलच्या साह्याने एक माणूस सायकल चालवणे व दुसरे दोन माणसं साईटच्या बाजूने शेंगाचे कार्ड धरून सोप्या पद्धतीने शेंगा काढण्याचे काम करताना दिसून आले हे यंत्र दहा-बारा माणसांचे काम एका यंत्राने करून दाखवले आहे अशाच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावे असे शेतकऱ्यांना आवाहन केले आहे.



# महाराष्ट्राला ‘नररत्न’ देणाऱ्या आष्टीतील मातेचा पुणे येथे ऐतिहासिक नगरीत सन्मान

## श्रीमती साखरबाई विष्णुपंत थोरवे आदर्श माता पुरस्काराने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

राजमाता जिजांऊच्या पदस्पर्शाने पावन झालेली महाराष्ट्राची भूमी ही साधू संतांची भूमी आहे. ही त्यागांची भूमी आहे,नररत्नाची भूमी आहे, शूरवीर योद्ध्यांची भूमी आहे. अशा या कर्मविरांच्या भूमीतून ज्यांनी राज्याबरोबर आपल्या गावचे नाव सुवर्ण अक्षराने उज्वल केले. ज्यांनी आपल्या मातीशी इमान राखत कायम सत्कर्माला महत्त्व दिले असे एम.आय. टी युनिव्हर्सिटी पुणे येथे आपल्या कार्य कर्तुत्वाची छाप पाडणाऱ्या डॉ.महेश विष्णूपंत थोरवे यासारख 'नररत्न' ज्या मातेने या मातीला दिले अशा महान विभूती श्रीमती साखरबाई विष्णूपंत थोरवे यांना मराठवाडा मित्र परिवार पुण्याच्या वतीने मराठवाडा आदर्श माता-पिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे,अश्या अनेक मातापित्यांना सलाम करण्यासाठी दरवर्षी हा सन्मान सोहळा साजरा करण्यात येत असतो

मराठवाड्याच्या यशाची पताका देश-विदेशात फडकावणारे सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय व प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे,आपल्या गावाबरोबर देशाचे, राज्याचे नाव सुवर्ण अक्षराने लिहिलं जावं यासाठी अहोरात्र कष्ट करणाऱ्या विभूतीनां तर दरवर्षी पुरस्काराने सन्मानित करण्यात येतात परंतु त्यांच्या या अफाट यशाच्या पाठीमागे एक अदृश्य शक्ती असते अन ती शक्ती म्हणजे त्यांचे आईवडील... त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून खचून न जाता मोठ्या कष्टाने आपल्या मुलांना सुसंकृत केले, विद्याविभूषित केले, मुलांना शिकवलं अशा किर्तीवंत यशवंत मुलांना घडवणाऱ्या मराठवाड्यातील आदर्श माता- पित्यांचा सन्मान होणं गरजेचं होतं म्हणून मराठवाडा मित्रपरिवार आयोजित एमआयटी कोथरूड



येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात आदर्श माता पिता सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्याच्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात बोलतांना एमआयटी चे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले की,आपल्या सर्वांच्या जडणघडणी मध्ये आपल्या आई-वडिलांची भूमिका महत्त्वाची असते. सद्गुणी पालकांमुळेच या विश्वात एक चांगला माणूस घडतो. राजे शहाजी व माँसाहेब जिजाऊच्या शिकवणीमुळेच छत्रपती शिवाजी महाराज हे रयतेचे राजे होऊ झाले. म्हणूनच शहाजी जिजाऊंसारखे पालक व्हा!' असे विचार एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा.कराड यांनी व्यक्त केले. मराठवाडा मित्रपरिवार आयोजित एमआयटी कोथरूड येथील संत ज्ञानेश्वर सभागृहात आदर्श माता पिता सन्मान सोहळ्याच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा.डॉ.मिलिंद आव्हाड,अँटी करप्शनचे अप्पर पोलीस अधीक्षक विजय चौधरी, माऊली ग्रुप कंपनीचे चेअरमन श्रीकांत शेळके,डायना बायोटेक कंपनीचे चेअरमन डॉ. विनोदकुमार पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच एमआयटी युनिव्हर्सिटीचे संचालक डॉ.महेश थोरवे व डी. एम.व्ही.इंडिया ग्रुपचे चेअरमन दत्ताजी मेहत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.






# कै.उत्तमराव जोगवाडकर माध्यमिक आश्रम शाळा चारठाणा उज्वल निकालाची परंपरा कायम

## शाळेतील ३५ विद्यार्थी विशेष श्रेणीत उत्तीर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

चारठाणा । श्रीपाद जोशी

माच २०२४ मध्ये संपन्न झालेल्या इयत्ता १० वी परीक्षेमध्ये चारठाणा येथील कै. उत्तमराव जोगवाडकर माध्यमिक आश्रम शाळेने त्यांची उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेतुन गजमल अदित्य मन्मथ व कु.जाधव अपर्णा अशोक या दोघांनी ८६.८०% गुण घेऊन शाळेतुन संयुक्त प्रथम क्रमांक मिळवला. तर कु.घाटुळ पल्लवी कैलास हिने ८६.४०% गुण मिळवून द्वितीय तर अवचार गोपिनाथ याने ८६.२०% गुण मिळवून तृतीय क्रमांक शाळेचा एकूण निकाल ९७.२२% लागला आहे. शाळेतून परिक्षेला बसलेल्या ७६ विद्यार्थ्यांपैंकी विशेष प्राविण्यासह ३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.प्रथम श्रेणीत २७ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. शशिकांत दादा देशपांडे , सचिव मा. श्री. विजयराव कान्हेकर, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालक श्रीमती गीता गुठ्ठे मॅडम ,महाविद्यालयाचे प्राचार्य मा. श्री. टी.बी.पालवे सर तसेच सर्व प्राध्यापक,शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# संत जनार्धन माध्यमिक विद्यालयाचा ९५.९१ निकाल; दहावीतही मुलींचीच बाजी






■ लोकनेता न्यूज नेटवर्क

चारठाणा । श्रीपाद जोशी

येथील नामांकित असणाऱ्या संत जनार्धन माध्यमिक विद्यालयाची दहावी निकालात बाजी मार्च २४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल मंडळाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन घोषीत करण्यात आला असुन १९६विद्यार्थी प्रविष्ठ झाले त्यापैकी १८८विद्यार्थी उत्तीर्ण झाले यातील १३१विद्यार्थी विशेष प्राविण्य ५०विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ७विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत गुणाणुक्रमे प्रथम गिते विद्या रमेश ९३.४० द्वितीय देवकर वेदिका शिवाजी व थोरात संस्कृती गजानन ९३ तृतीय जोगवाडकर अपर्णा गजानन ९१.४०.गुणांसह यश प्राप्त केले आहे यशस्वी विद्यार्थ्यांना अध्यक्ष मुकुंद चव्हाण, सचिव नामदेव चव्हाण उपाध्यक्ष रामराव चव्हाण कोषाध्यक्ष विलास चव्हाण प्राचार्य शिवशंकर महाजन पर्यवेक्षक रमेश राठोड नामदेव जाधव बाळकृष्ण केदारी महेंद्र फटके प्रा.दीपक कुलकर्णी प्रा.आरेफोदीन शेख आत्तम राठोड व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनीअभिनंदन करुण पुढील शैक्षणिक कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या...

# नंदराज रुंजे यांनी दहावी बोर्ड परीक्षेत ९७.२०% घेऊन घवघवीत यश मिळविले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा इयत्ता दहावी निकाल जाहीर झाला आहे.यात संगुचीवाडी येथील नंदराज शिवराज रुंजे यांनी उत्तुंग यश मिळवलंय. तो श्री देशिकेंद्र विद्यालय लातूर येथे शिकत होता . त्याला तब्बल ९७.२० टक्के गुण मिळाले आहेत .घरची परिस्थिती गरीबीची, अशा बिकट आर्थिक परिस्थितीत अभ्यासात एकाग्रता, सातत्य, ध्येयप्राप्ती चिकाटी असलेल्या संगुचीवाडी येथील नंदराज शिवराज रुंजे या मुलाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून दहावी परिक्षेत ९७.२० टक्के गुण मिळवून आई वडीलांच्या श्रमाचे चीज केले आहे.



नंदराजच्या यशाबद्दल त्याचा चुलता ( काका) सांगतात की, माझा पुतण्या हुशार आहे. त्याने दहावीत जवळपास ९८ % मार्क्स घेतले आहेत . त्याला पुढे जे काही करायचं आहे, त्याला आमचा पूर्ण पाठिंबा आहे. त्याने मिळवलेले चांगले मार्क्स पाडून रुंजे कुटुंबात चांगलं यश मिळवलं आहे. त्याचा आम्हाला गर्व आहे.भविष्यात त्याला जे पण करायचं आहे त्यासाठी मी त्याच्यासोबत आहे, असं चुलता ( काका ) कैलास पांडुरंग रूंजे यांनी सांगितलं.ते पुढे म्हणाले की माझा पुतण्या डॉक्टर बनावा ही आमची इच्छा आहे आणि माझा पुतण्या आमची इच्छा नक्कीच पूर्ण करेल .त्याच्या यशात आजी ,आजोबा ,आई , काका , काकू, आत्या - मामा यांच्या पाशी शिक्षण घेऊन यश मिळवले , शाळेतील शिक्षक ,नातेवाईक यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले आहे .त्याच्या यशाबद्दल शाळेतील शिक्षक यांनी पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्या दिल्या. शैक्षणिक, राजकीय, सामाजिक सर्व स्तरावरुन कौतुक होत आहे.

# कंधार तालुक्यात हाहाकार अर्ध्या तासात झाले होत्याचे नव्हते

## बाबूळगावात टॉवर पडून एक ठार,पत्रे उडाली, विद्युत खांब तुटले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे

कंधार तालुक्यातील परिसरात वादळी वाऱ्याने हाहाकार मजवला क्षणार्धातच होत्याचे नव्हते झाले,हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार बहुतांशी ठिक-ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. वादळी वाऱ्यामुळे झाडे-झुडपे मुळासह उन्मळून पडल्याच्याही घटना घडल्या, दरम्यान कंधार शहरांसह तालुक्यातील अनेक गावांत अचानक वादळी वाऱ्यामुळे अर्ध्या तासात नागरिकांची दैना केली,दि २६ मे रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास दुर्दैवी घटना




घडली. बाबुळगाव येथील एका व्यक्तीवर घरावरील बांधकाम केलेले टॉवर पडून जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की,रविवारी दुपारी ३ वाजताच्या सुमारास वादळी वाऱ्याने झाडे उन्मळून पडले. रस्त्यालगत असलेले हॉटेल, दुकानाच्या समोरील पत्रे उडाले अनेक झाडे, फांद्या कोलमडल्या. तर बाबुळगाव येथील शेजारच्या घरावरील टॉवर बालाजी गणपती बोरोळे वय ४५ वर्षे हे घरी जेवायला बसले असताना यांच्या अंगावर पडून त्यांचा जागीच प्राण गेल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.त्यांच्या पश्चात दोन मुली एक मुलगा पत्नी आणि आई असा परिवार आहे. शहरासह तालुक्यातील अनेक गावांत अचानक वादळी वाऱ्यामुळे अर्धा तासातच नागरिकांची दैना केली.ठिकठिकाणी विज वाहिनीवर झाडे पडल्याने शहरातील बहुतांश भागात वीज गायब होती.दरम्यान कलिंगड, काकडी,भाजीपाला आणि आंबा फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

# भोकरदन शहराला विद्युत पुरवठा नियमित व्हावा यासाठी आम आदमी पार्टी करणार आंदोलन-बोरसे गुरुजी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

शेख जफर । भोकरदन

अनियमित विद्युत पुरवठ्यामुळे सर्व नागरिक त्रस्त झाले आहेत.भोकरदन मध्ये दंडासह वीज बिल वसुली करून ही वीज वितरण कंपनी ग्राहकांना सेवा का देत नाही ? आम आदमी पार्टीचे शहराध्यक्ष महजाद खान यांच्या नेतृत्वाखाली आज नागरिकांनी वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात भेट देऊन संबंधित कर्मचाऱ्यासोबत चर्चा केली आणि विद्युत पुरवठा नियमित होण्यासाठी भोकरदन सब स्टेशन वरूनच विद्युत पुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत



सविस्तर असे की, मा. उपकार्यकारी अभियंता म.रा. वि.वि. कं.म.उपविभाग भोकरदन याबाबत खालील प्रमाणे निवेदन देण्यात आले आहे. जोमाळ्याच्या फिडरवरून डीपी जोडण्यात आल्यामुळे वीज वारंवार जाते त्यामुळे पूर्वीप्रमाणेच संपुर्ण भोकरदन शहराची जोडणी सबस्टेशन वरुनच राहू द्यावी आपणास कळविण्यात येत की सदरहु भोकरदन शहराच्या काही भागाची जोडणी जोमाळ्याच्या फिडरवरून करण्यात आल्यामुळे लाईन वारंवार जाते. तसेच फ्युज वारंवार जातात. त्यामुळे वीज ग्राहकांना खुप त्रास सहन करावा लागतो. होल्टेज ही फार कमी असते. वीजेची उपकरणे शोभेच्या वस्तु झाल्या आहेत.विद्युत उपकरणांचे नुकसान होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा प्रकाश मिळत नाही. विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे.आजारी वृध्दांना पंखा चालत नसल्याने मच्छरांचा त्रास होतो.वीजेची इतर उपकरणे सेवा देऊ शकत नाहीत. तरी आपणास विनंती की जोमाळ्याच्या फिडरवरून जोडणी करण्यात येऊ नये ती पूर्वीप्रमाणे सबस्टेशस वरुनच जोडलेली राहू द्यावी. लाईटचा आम्हाला फार त्रास होत आहे. आपणास यासाठी सात दिवसाची मुदत देण्यात येत आहे..आपल्या कार्यालयाकडुन कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही तर दि ५ /६ / २०२४ रोजी शहरातील रहीवाशांचा मोर्चा आणण्यात येईल.होणार्या परीणामांची जबाबदारी आपल्या कार्यालयाची असेल. याची नोंद घ्यावी. असा इशारा देण्यात आलेला आहे. यावेळी महजाद खान शहर अध्यक्ष आम आदमी पार्टी, फारुख भाई, शेख बाबर,शेख इम्रान, बिसमिल्ला पठाण, फेरोज, अमन खान,मुजाहिद, खिजार सिद्दीकी, अनिस पठान इब्राहिम कुरेशी,जमील कादि्र, मुजीब,शेख सलीम, नारायण सोन्नी यांच्यासह पार्टिचे कार्यकर्ते हजर होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904